... ... Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8C. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार १७ जानेवारी, १९६८ | अंक २

## विविध माहिती

**सहकारी साखर कारखान्यांनी स्वतः साखर विकावी**— महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी गिऱ्हाइकांना साखर विकण्यासाठी स्वतःचीच दुकाने उघडावी अशी सूचना मध्यवर्ती राज्यमंत्री श्री शिंदे ह्यांनी केली आहे. मुंबई, पुणे व नागपूरसारख्या मोठ्या शहरांतून अशी दुकाने उघडण्यात आल्यास साखरेच्या किमती योग्य पातळीवर राहतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**खादीला भाव मिळाला**—दक्षिण भारतामधील राज्यात अलीकडे खादीचे कापड गिऱ्हाइकाअभावी मोठ्या प्रमाणावर पडून होते. पण आता खादीला चांगला भाव आला आहे. कारण हैद्राबाद येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनासाठी उभारण्यात आलेल्या मंडपासाठीच ७८, ७०० चौरस फूट खादी लागली आहे. त्याशिवाय ५ हजार गांधी टोप्या व स्वयंसेवकांचे गणवेश लागले.

**पाकिस्तानची लोकसंख्या**—पाकिस्तान सरकारने वाढत्या लोकसंख्येच्या धोक्याला तोंड देण्यासाठी जारीने उपाययोजना करण्यास प्रारंभ केला आहे. दरमहा करावयाच्या निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रियांची संख्या ३० हजारांवरून ६० हजारांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लोकसंख्येच्या प्रश्नाचा अभ्यास करणाऱ्या एका मंडळाने असा अंदाज केला आहे की येत्या २० वर्षांत पाकिस्तानची लोकसंख्या सध्याच्या दुप्पट होईल. सध्या ती ११ ते १२ कोटी आहे.

**मेक्सिकन गव्हाची लागवड**—राजस्थानमधील अलवार जिल्ह्यात एका नव्या प्रकारच्या मेक्सिकन गव्हाच्या जातीची लागवड २५ हजार एकरांत करण्यात आली आहे. दर एकरी अधिक पीक देणारी म्हणून ही जात प्रसिद्ध आहे. योग्य मशागत झाल्यास गव्हाच्या नव्या बियाणामुळे दर एकरी ३० मण पीक येईल अशी अपेक्षा आहे.

**नागाच्या विषाची किंमत**—सर्पविषासाठी येणारी मागणी वाढत चालली आहे. कारण, सर्पविषाचा कर्करोगावर उपचार करण्यासाठी अधिकाधिक वापर होत आहे. सर्पविषाची किंमत सोन्यापेक्षा १२ पटींनी अधिक आहे, अशी माहिती अखिल भारतीय शास्त्र परिषदेत सांगण्यात आली.

**केरळमध्ये नवे उद्योगधंदे**—केरळ राज्यात पूर्व युरोपातील देश व रशिया ह्यांच्या मदतीने नवीन उद्योगधंदे सुरू करण्याची शक्यता असल्याचे राज्याचे मुख्य मंत्री श्री. नंबुद्रीपाद ह्यांनी सांगितले आहे. नवे उद्योगधंदे खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही विभागांत काढण्यात येतील. परंतु राज्यातच पुरेसा पैसा जमा झाल्यास मात्र नवीन उद्योगधंदे सार्वजनिक मालकीत निघतील, असेही ते म्हणाले.

**घेराओत बंगाल पुढे**—सप्टेंबर अखेर पुऱ्या झालेल्या ६ महिन्यांच्या अवधीत १३ राज्यात मिळून ९२८ घेराओंचे प्रकार झाले. त्यापैकी ८४१ प्रकरणे बंगालमध्ये झाली. त्यानंतरचा क्रमांक बिहारचा लागतो. बिहारमध्ये ३४ घेराओ झाले. केरळात १०, आंध्र प्रदेशात ९ आणि उत्तर प्रदेशात ७ घेराओ प्रकरणे झाली.

**बँकिंगचे कायदे कोणी करावे?**—मद्रासच्या मंत्र्यांनी अशी माहिती जाहीर केली आहे की मद्रास सरकार बँकिंगविषयीचे कायदे करण्याचे अधिकार राज्यांना द्यावे अशी मागणी भारत सरकारकडे करणार आहे. सध्या ह्यासंबंधीचा घटनात्मक विचार चालू आहे. इतर सावकारांप्रमाणे बँकाही कर्जे देण्याचा धंदा करतात; तेव्हा हा विषय राज्यांकडे सोपवावा असे त्यांचे म्हणणे आहे.

**एक सनातन वाद**—नागपूर येथील लायन्स क्लबने कॉलेजांतर्गत वादविवाद स्पर्धा भरविली होती. वाद स्पर्धेचा विषय "स्त्रीला कशाची अधिक गरज आहे? सौंदर्याची की बुद्धीची?" हा होता. वादविवादात भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी प्राचीन इतिहासातील अनेक रूपमती व बुद्धिमती स्त्रियांची नावे आपआपल्या बाजूच्या समर्थनार्थ आणली, त्यात ट्रॉयची हेलेन, क्लिओपात्रा, मेरिलिन मन्रो, मॅडम क्युरी, इत्यादींची नावे होती.

**मिठाच्या निर्यातीत वाढ**—भारतामधून होणारी मिठाची निर्यात वाढत आहे. सर्वांत अधिक निर्यात जपानला करण्यात येते. मीठ निर्माण करण्याच्या बाबतीत गुजरातचा पहिला अनुक्रम लागतो. १९६५ साली मद्रास राज्याने ७ लाख टन मीठ निर्माण करून गुजरातच्या खालोखाल दुसरा अनुक्रम मिळविला

## दि कोल्हापूर शुगर मिल्स लि., कोल्हापूर

### डिस्टिलरी आणि केमिकल्स ह्यांचे वाढते उत्पादन

कोल्हापूर शुगर मिल्सला, घसारा आणि डेव्हलपमेंट रिबेट साठी ४०,००,००० रुपयांची तरतूद केल्यावर आणि मॅनेजिंग एजन्सीला ५०,००० रु. एजन्सी कमिशन ( कराराप्रमाणे कमीत कमी रक्कम ) दिल्यानंतर ७,०२,०९० रु. तोटा आला. गेल्या वर्षी रिझर्व्हमधून डिव्हिडंड दिले होते; यंदा डिव्हिडंड देता आलेले नाही. ह्यांची कारणे अगदी स्पष्ट आहेत. गेल्या दोन वर्षांतील अवर्षणामुळे उसाची विहिरीच्या पाण्यावरील कमी झालेली लागवड, महाराष्ट्र सरकारने पाणीपुरवठ्यात केलेली २५% कपात, गुळाचे आकर्षक भाव, इत्यादींमुळे मिल्सकडे गळितासाठी १,६१,६३१ टन म्हणजे ४१% ऊस कमी आला आणि साखरेचा उतारा ११·७२% वरून १२·५१% वर जाऊनही साखरेचे उत्पादन ४३,२३२ मे. टनांवरून २७,१६४ मे. टनांवर आले. इकडे साखरेचा उत्पादनखर्च मात्र अनिवार्यपणे वाढला; मध्यवर्ती सरकारने ठरवून दिलेल्या दर टनी उसाच्या दरापेक्षा मिल्सला रु. २·६० जादा द्यावे लागले. साखरेची नियंत्रित किंमत मात्र फारच थोडी क्विंटलला रु. ४·९५ ) वाढली. केमिकल्स प्लँटसच्या व्यहारातील बेकिफायतशीरपणामुळे तोट्यात भरच पडली. डिस्टिलरीचे उत्पादन समाधानकारक झाले. रेक्टिफाइड स्पिरिटचे उत्पादन ४५,३९,६४३ लिटर्सवरून ६७,५२,७५९ लिटर्सवर गेले आणि ॲबसोल्यूट अल्कोहोलचे उत्पादन ५,३९,१६१, लिटर्सवरून ६,२४,९१० लिटर्सवर गेले. ह्यापैकी बहुतेक उत्पादन कंपनीच्या केमिकल प्लँटसमध्ये वापरले गेले; बाहेर विक्रीसाठी फारसे उपलब्ध झाले नाही. ॲसेटिक ॲसिड, ब्युटेनॉल आणि ब्युटिल ॲसिटेट ह्यांचे उत्पादन वाढीच्या मार्गावर आहे. केमिकल्सची एकूण विक्री ५१,१८,००० रुपयांची झाली. ही केमिकल्स शाखा मिल्सच्या नफ्यात मोलाची भर घालू शकेल, अशी आता आशादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. डिस्टिलरीच्या ऑईल मिलच्या आणि केमिकल डिव्हिजनच्या बऱ्याच भांडवली खर्चावरील व्याजाचा मोठा बोजा ताळेबंदावर पडतो; पण तीच गुंतवणूक ह्यापुढे अधिकाधिक किफायतशीर होणार असल्याने ह्या क्षेत्राचे उत्पादन वाढविण्याकडे संचालकांचे साहजिकच लक्ष आहे. ऊसपुरवठ्यावर आणि त्याच्या किफायतशीर किंमतीवर भरवसा ठेवून ह्यापुढे चालणार नाही, ह्याची त्यांना जाणीव आहे. मिल्सच्या कारभाराची धुरा जनरल मॅनेजर श्री. मदनमोहन बसंतिलाल लोहिया, ह्यांच्या तडफेचे, चातुर्याचे आणि कार्यकौशल्याचे कौतुक मिल्सचे चेअरमन श्री. रामनिवासजी रामनारायणजी रुईया ह्यांनी केले; ते सार्थच आहे. नवे वर्ष मिल्सला अधिक चांगले जाईल, अशी अपेक्षा आहे.

---

## पाच टायपिस्ट मुलींचा नव्या वर्षाचा नियम

### देशासाठी दररोज अर्धा तास वेतन न घेता जादा काम

कोणत्याही राष्ट्राचा जिवंतपणा त्याच्या नागरिकांच्या सामाजिक कर्तव्यबुद्धीवर अवलंबून राहतो. ही कर्तव्यनिष्ठा नसेल, तर समाज केव्हा रसातळास जाईल, हे सांगता येत नाही. नेहमी दैवावर अवलंबून राहणे धोक्याचे असते. भारतासारख्या ज्या देशाने विकासाची गती अद्याप प्राप्त केलेली नाही, त्या देशांच्याबाबतीत हे विशेषत्वाने खरे आहे. ग्रेटब्रिटनसारख्या देशाची विकासाची गती मंदावली आहे. त्याही देशाला हा धोका आहे. सरकारी प्रयत्नांवर अवलंबून न राहता नागरिकांनीच जबाबदारी ओळखून आपली कर्तव्ये कसोशीने पार पाडली पाहिजेत.

सरबिटन (इंग्लंड) येथील एका कारखान्यातील पाच टायपिस्ट मुलींनी इंग्लंडमध्ये इंग्रजी वर्षप्रतिपदेला म्हणजे १ जानेवारी रोजी एक महत्त्वपूर्ण निर्णय केला, तो म्हणजे दररोज अर्धा तास जास्त काम जास्त वेतन न घेता करावयाचे. त्यांच्या पाठोपाठ कारखान्यांतील सर्व म्हणजे २४० कामगारांनीही असाच निश्चय केला. ह्यामुळे, कारखान्याच्या उत्पादनात ७% वाढ होईल अशी अपेक्षा आहे. कारखान्याने आपल्या मालाच्या किमती ५% ने उतरविल्या आहेत आणि भागधारकांनी डिव्हिडंडमध्ये २५% कपात मान्य करण्याचे ठरविले आहे. फ्रान्सचा प्रेसिडेंट द गॉल ह्याचा, इंग्लंडने त्याच्याकडे भिक्षेकरी म्हणून यावे, असा टाळा आहे. त्याला ह्या पाच मुलींनी उत्तर दिले आहे; त्यांचे अनुकरण इतर कारखान्यांतूनही होऊ लागले आहे.

भारताचे कामगार आणि रोजगार मंत्री श्री. जयसुखलाल हती, ह्यांनी राज्यसभेत नुकतेच सांगितले की, गेल्या वर्षी जानेवारी ते सप्टेंबर ह्या मुदतीत संप आणि टाळेबंदी ह्यांमुळे भारतात ६७·७७ लक्ष 'कामगार दिवस' वाया गेले. १९६६ मध्ये तत्सम आकडा १३३·४६ लक्ष 'कामगार दिवस' एवढा होता. विशेषतः पश्चिम बंगालमध्ये हे नुकसान विशेष झाले. ( अनुक्रमे २४·२८ लक्ष आणि ३८·१३ लक्ष. 'कामगार दिवस' ) भारतातील उत्पादनावर कामगारांच्या विपरीत मनोवृत्तीचा केवढा मोठा गंभीर दुष्परिणाम होत आहे. उत्पादनवाढीतूनच वेतनवाढ शक्य होणार, हे पटवून देण्यास कुणीच पुढे येत नाही. ही परिस्थिती कामगारापुरतीच मर्यादित नाही. कमीतकमी काम करण्याची प्रवृत्ती सर्व क्षेत्रांत आणि थरात आढळते. लोकशाही समाजरचनेत व्यक्तींचा चुकारपणा साथीसारखा पसरतो आणि समाजवादी समाजरचनेचे ध्येय दूर दूर जाऊ लागते. सरबिटनच्या पाच मुलींनी घालून दिलेले उदाहरण भारतातही अनुकरणीय आहे.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १७ जानेवारी, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । – कौटिलीय अर्थशास्त्र


## अमेरिकेच्या आर्थिक मदतीबद्दल धोक्याचा इशारा

अमेरिकेतील एका समाजशास्त्रीय संस्थेचे संचालक डॉ. स्कॉट निअरिंग ह्यांचे बंगलोर येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक अफेअर्सच्या विद्यमाने व्याख्यान झाले. आपल्या व्याख्यानात ते म्हणाले की अमेरिकेने भारताच्या आर्थिक जीवनात प्रवेश केलेला आहे. ह्या चंचुप्रवेशातून राजकीय नियंत्रण आणि लष्करी सत्ता स्थापन होण्याचा धोका आहे. अमेरिका आजच आशिआतील एक प्रबळ सत्ता झाली असून जगातील समाजवादी देशांच्या विभागाचा नाश करण्याचे तिचे धोरण आहे. पूर्व आणि पश्चिमेला महासमुद्र असलेल्या ह्या देशाने युरोप आणि आशिया खंडांत आपली सत्ता स्थापन केलेली आहे. भारताचे मोक्याचे भौगोलिक स्थान आणि त्याची अफाट लोकसंख्या ह्या दोन्हींचा वापर करून जगातील पहिल्या प्रतीची सत्ता बनण्याचा अमेरिकेचा विचार दिसत आहे. अमेरिकेच्या युरोपमधील चंचुप्रवेशाला ५० वर्षांपूर्वी प्रारंभ झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने आपले डॉलरराज्य उभारले आणि युरोपच्या अर्थव्यवस्थेवर मोठी पकड बसविली. १८९८ साली स्पेनचा पराभव केल्यानंतर अमेरिकेने फिलिपाईन्स बेटे ताब्यात घेतली. तेव्हापासून अमेरिकेच्या आशिआतील प्रवेशाला प्रारंभ झाला. दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव झाल्यावर आशिआ खंडात उपलब्ध असलेल्या फार मोठ्या संधीची अमेरिकेला जाणीव झाली. फिलिपाइन्स, फोर्मोसा आणि जपानपासून घेतलेली इतर बेटे ह्यांचा उपयोग करून जगात प्रभुत्व मिळविण्याची शक्यता अमेरिकेला दिसू लागली. आशिआत आर्थिक वर्चस्व स्थापन करून राजकीय सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न आता चालू आहे.

## कर्जांच्या परतफेडीच्या अनिश्चिततेचा परिणाम

जागतिक बँकेने पुरस्कारलेल्या, भारताला मदत करणाऱ्या देशांच्या गटाकडून १९६७–६८ साली भारताला ९० कोटी डॉलर्सची मुक्त मदत देण्यात येणार होती. परंतु आता अशा प्रकारची मुक्त मदत ६० कोटी डॉलर्सपेक्षा अधिक मिळणार नाही. अमेरिकेकडून मिळणाऱ्या मदतीत मोठ्या प्रमाणावर कपात झाल्यामुळे अशी परिस्थिति उद्भवली आहे. मुळात अमेरिकेकडून ३८ कोटी डॉलर्सची रक्कम मिळेल अशी अपेक्षा करण्यात आली होती. ती फोल ठरली असून प्रत्यक्ष मदतीचा आकडा १० कोटी डॉलर्सनी अगर त्याहीपेक्षा अधिक कमी होणार आहे. अमेरिकेकडून मिळणाऱ्या मदतीतील कपात भरून काढण्याचे प्रयत्न भारत करीत आहे. जागतिक बँकेशी संलग्न असलेल्या इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशनमार्फत मदतीमधील अनपेक्षित कपात भरून काढण्याची खटपट चालू आहे. तथापि वरील संघटना चालू आर्थिक वर्षात भारताने मागितलेली २० ते ३० कोटी डॉलर्सची रक्कम देऊ शकेल की नाही ह्याविषयी शंका व्यक्त करण्यात येत आहे. एकंदरीने परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीचे चित्र फारसे आशाजनक दिसत नाही. पण त्याचे कारण अपेक्षित मदतीत झालेली कपातच फक्त आहे असे मात्र नाही. भारताने परदेशांकडून मदतीदाखल घेतलेल्या कर्जांपैकी चालू वर्षी ४० कोटी डॉलर्सची रक्कम परत करावयाची आहे. परतफेडीची व्यवस्था करण्याचे काम जागतिक बँकेकडून १९६७ च्या सप्टेंबर–ऑक्टोबर पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा होती. पण परतफेडीच्या हप्त्यांची पुनर्रचना करून ते दीर्घ कालावधीवर पसरणे भारताच्या आर्थिक कमकुवतपणामुळे भाग झाले आहे. अशा परिस्थितीत धनको देश नव्याने द्यावयाच्या मदतीसंबंधी निर्णय घेण्यास नाखूष आहेत.

## करमाफीची मर्यादा वाढविण्याची सूचना

हिंदमधील करपद्धतीत सुधारणा करून ती अधिक सुटसुटीत व कमी गुंतागुंतीची करण्यासंबंधी सूचना करण्यासाठी मध्यवर्ती सरकारने अर्थ खात्याचे माजी चिटणीस श्री. भूतलिंगम् ह्यांची नेमणूक केली होती. त्यांनी आपला अखेरचा अहवाल आता सरकारला सादर केला आहे. प्राप्तीकरास पात्र असलेल्या उत्पन्नाची मर्यादा ७,५०० असावी अशी एक सूचना त्यांनी केली आहे. गेल्या काही वर्षांत पैशाची किंमत अथवा त्याची खरेदीची शक्ती कमी झाल्याचे कारण देऊन त्यांनी आपल्या सूचनेचे समर्थन केले आहे. त्यांनी आपल्या अहवालात आणखीही शिफारसी केलेल्या आहेत; आणि त्या अमलात आणल्या गेल्यास प्राप्तीवरील करमाफ उत्पन्नाची मर्यादा वाढविल्याने सरकारच्या उत्पन्नात घट होणार नाही असे मतही त्यांनी व्यक्त केले आहे. सध्या करमाफ उत्पन्नाची मर्यादा ३,५०० रुपये आहे. त्याशिवाय तीन मुलांपर्यंत प्रत्येक मुलामागे ३०० रुपयांची रक्कम करमाफ उत्पन्नात मिळविण्यात येत

असते. करमाफ उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याच्या सूचना ह्यापूर्वीही करण्यात आलेल्या आहेत. परंतु सरकारने त्या स्वीकारलेल्या नाहीत. आताही ही सूचना स्वीकारली जाण्याचा संभव फारसा नाहीच. श्री. भूतलिंगम् ह्यांच्या मताने सरकारच्या उत्पन्नात घट होण्याची शक्यता टाळता येण्यासारखी असली तरी सरकारच्या पोटात उत्पन्न घटण्याच्या भीतीने ठाण मांडलेले असणे अगदी शक्य आहे. आधुनिक सरकारी यंत्रणेच्या व कारभाराच्या आर्थिक जबाबदाऱ्या एकसारख्या वाढतच जातात असा अनुभव आहे. ह्या अनुभवापोटी करांच्या उत्पन्नात घट होण्याची शक्यताही सरकारला अस्वस्थ करणारी असते.

## शास्त्रीय शोधांचा उद्योगधंद्यांतील उपयोग

इंडिअन सायन्स काँग्रेसच्या ५५ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. आत्माराम ह्यांनी भारतामधील शास्त्रीय संशोधन आणि त्याचा उद्योगधंद्यांतील उपयोग ह्याविषयी आपले विचार व्यक्त केले आहेत. डॉ. आत्माराम म्हणाले की भारतांत शास्त्रीय संशोधनाचे कार्य सरकारने पुरस्कारलेल्या संस्थांतून बहुतेक करण्यात येते. परंतु संशोधनामुळे प्राप्त झालेल्या फलितांचा उपयोग मात्र खाजगी अगर सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांत करावा लागतो. त्यामुळे शोध आणि त्यांचा व्यावहारिक उपयोग ह्यांची सांगड घातली जात नाही. तरी पण ह्यात न समजण्यासारखे काही नाही. कारण ज्या देशांतून संशोधन आणि त्याचा व्यावहारिक उपयोग एकाच छत्राखाली आहेत तेथेही नवे प्रयोग करण्याच्या बाबतीत विरोधच दिसून येतो. संशोधन आणि त्याचा उपयोग ह्यांच्यातील तफावत हे एक वैगुण्य आहे. ज्या त्या उद्योगधंद्याने आपआपले संशोधन करणे हा मार्ग सर्वांत उत्तम आहे. भारतामधून बाहेर पडणाऱ्या बुद्धिमंतांविषयी बोलताना डॉ. आत्माराम म्हणाले की कामधंद्यासाठी परदेशी गेलेल्या हिंदी शास्त्रज्ञांना व संशोधकांना सरसकट भारतात परत येण्याचे आवाहन करणे इष्ट नाही. भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकास होऊन त्यांना योग्य कामात सामाऊन घेण्यासारखी परिस्थिती आधी उत्पन्न झाली पाहिजे. नाहीपेक्षा अशा लोकांच्या परतण्याने देशातील सध्याचे कुचंबणेचे आणि विफलतेचे वातावरण अधिकच बिघडून जाईल. एंजिनिअरिंगच्या पदवीधरांना नोकऱ्या देणे दिवसानुदिवस बिकट होत चालले आहे. ह्यावरूनसुद्धा परिस्थिती सावधपणे हाताळण्याची जरुरी स्पष्टच होत आहे.

## आफ्रिकेत चीन रेल्वे बांधणार

झांबिया आणि तांझानिया ह्यांना जोडणारा १,००० मैल लांबीचा आगगाडीचा रस्ता बांधून देण्याचा चीनने त्या देशांशी करार केला आहे. त्यासाठी सुमारे २०० कोटी रुपयांचा खर्च चीन करणार आहे.

## लुधिआना येथील कापड गिरण्या संकटांत

लुधिआना येथील कापडाच्या गिरण्या आर्थिक संकटात सापडल्या असल्याची वार्ता आहे. लुधिआना ह्या गावात एकेकाळी म्हणण्यासारखा उद्योगधंदा नव्हता. पण, अलीकडील काही वर्षांत तेथे लोकरीच्या व इतर तऱ्हेच्या कापडाच्या छोट्या गिरण्या भरभराटल्या होत्या. लोकरीचे कापड व त्याचे कपडे ह्यासंबंधी लुधिआनाने मोठे नाव कमावलेले होते. भारतामधून निर्यात होणाऱ्या लोकरीच्या कापडापैकी ९५ टक्के कापड लुधिआना येथे तयार झालेले असते आणि त्याच्या निर्यातीमुळे भारताला सुमारे १२ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती होते. १९६२ साली भारतावर चीनचे आक्रमण झाले, त्यावेळी रात्रंदिवस काम करून लुधिआना येथील कापडगिरण्यांनी १२ कोटी रुपयांचे कपडे लष्कराला पुरविले. परंतु, ह्या कपड्यांची बरीच किंमत अजूनही गिरण्यांना मिळाली नाही असे म्हणतात. आर्थिक संकटात सापडलेल्या लुधिआना येथील गिरण्यांवर आणखी एक आपत्ती कोसळू पाहात आहे. लष्कराला लागणारे गरम कपडे तयार करण्यासाठी सरकार स्वत: मोठे कारखाने काढण्याचा विचार करीत आहे. असे कारखाने काढल्यामुळे गरम कपड्यांच्या उत्पादनखर्चात पाच टक्क्यांनी घट होईल असे कारण सांगण्यात येत आहे. तथापि लुधिआना येथील छोट्या कापडगिरण्यांना विस्ताराची परवानगी देण्यात आली तर त्याही उत्पादनखर्चात बचत करू शकतील असा दावा त्यांच्या वतीने करण्यात येत आहे. रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यापासून लुधिआना येथील कापडाच्या कारखान्यांना कच्च्या कामाचा तुटवडाही जाणवू लागला आहे. हा तुटवडा भरून काढण्यात आला तरीही परिस्थितीत सुधारणा होईल.

## रशियातील कारखान्यासाठी अमेरिकेची यंत्रसामग्री

रशियात उभारण्यात यावयाच्या एका मोटारीच्या कारखान्यासाठी अमेरिकन कारखानदार २ कोटी डॉलर्स किमतीची यंत्रसामग्री विकण्याची आशा बाळगून आहेत. अमेरिकेच्या सरकारच्या निर्यात-आयात बँकेमार्फत यंत्रसामग्रीसाठी भांडवल गुंतविण्यास अमेरिकन काँग्रेसचा विरोध आहे. त्यामुळे ज्या फिआट कंपनीतर्फे रशियात कारखाना बांधण्यात येणार आहे तिने अमेरिकेच्या मदतीविना भांडवलाची उभारणी करण्याचे ठरविले आहे. रशियातील हा कारखाना व्होल्गा नदीच्या तीरावर उभारण्यात येत असून त्यात ५ कोटी डॉलर्स किमतीची अमेरिकन यंत्रसामग्री बसविण्याची शक्यता होती. जी यंत्रसामग्री फिआट कंपनी देऊ शकत नाही ती आता पश्चिम युरोपातून घेतली जाईल.

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लि., कोल्हापूर.

दिनांक १८ डिसेंबर १९६७ इसवी रोजी भरलेल्या चौतिसाव्या वार्षिक साधारण सभेत कंपनीचे चेअरमन, श्री. रामनिवासजी रामनारायणजी रुईया, यानी केलेल्या इंग्रजी भाषणांचा मराठी गोषवारा.

सभेच्या सुरुवातीस चेंअरमन, श्री. रामनिवासजी रामनारायणजी रुईया यांनी कोयनानगर येथे अत्यंत नुकसान केलेल्या भयानक भूकंपाचा उल्लेख केला आणि कोयनानगर व आसपासच्या भागांत त्यामुळे झालेल्या जीविताच्या व मालमत्तेच्या अपार हानीबद्दल सभेच्या वतीने आपणाला झालेले मनस्वी दुःख आणि त्यात झळ पोहचलेल्यांच्या विषयी त्यांनी सहानुभूती व्यक्त केली. महाराष्ट्राच्या दृष्टीने तर ही आपत्ती नवीनच आहे. भूकंप पीडितांच्या मदतीसाठी सरकार आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत आहे आणि चोहोकडून मदतीचा वर्षाव सुरू आहे. शुगर मिलसच्या नोकरवर्गाने भूकंप पीडितांच्या मदतीसाठी एक दिवसाचा पगार देण्याचा ठराव केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून कंपनीतर्फे पंचवीस हजार रुपयांची मदत देण्याचे ठरविले आहे, असे त्यांनी सांगितले.

नंतर चेअरमनसाहेब म्हणाले—

आपल्या कंपनीच्या चौतिसाव्या वार्षिक साधारण सभेच्या प्रसंगी आपणा सर्वांचे स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

कंपनीच्या दिनांक ३० जून १९६७ अखेरच्या वर्षाची ताळेबंदपत्रके व डायरेक्टर्स यांचा अहवाल आपणास पूर्वीच मिळाला असून, आपण तो वाचलाच असेल.

१९६६–६७ सालात, ज्या नैसर्गिक व मानवनिर्मित कारणामुळे कंपनीस तोटा झाला त्याची माहिती डायरेक्टर्सच्या अहवालावरून आपणास मिळाली असेलच. १९६५–६६ साली देशात ३५·५ टनांचा उच्चांक गाठणाऱ्या साखरेच्या उत्पादनात या वर्षी एकदम आदमासे ४० टक्यांची मोठी घट होऊन ते २१·५ लक्ष टनांपर्यन्त खाली घसरले.

साखर धंदा हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा धंदा आहे हे आपणास माहीतच आहे. तरीही या एवढ्या मोठ्या उद्योगधंद्यासाठी दीर्घकालीन व व्यापक असे धोरण सरकारला अद्याप आखता आलेले नाही. कधी नियंत्रण, कधी विनियंत्रण, पुन्हा नियंत्रण तर कधी टंचाई, कधी जादा उत्पादन आणि पुन्हा टंचाई अशा परिस्थितीत साखरधंदा सारखे हेलकावे खात आहे. सध्या या धंद्यात अंशतः विनियंत्रणाचे युग चालू आहे. साखरेच्या बाबतीतील सरकारी धोरण हे केवळ तात्कालिक उपाययोजना म्हणूनच अवलंबिलेले दिसते.

अपुरा राखीव साठा व १९६६–६७ च्या हंगामातील उत्पादनात झालेली मोठी घट यांमुळे निर्माण झालेली परिस्थिती पूर्ववत सुधारण्याच्या हेतूने सरकारने साखरेबाबतचे नवे धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार, एकूण उत्पादनाच्या ६० टक्के उत्पादन, किमान १२ लाख टन इतकी साखर सरकार 'लेव्ही' म्हणून स्वतःकडे घेईल व ४० टक्के साखर देशात कोठेही खुल्या बाजारात विनानियंत्रण विकता येईल.

ग्राहकाला कमी दरात साखर मिळावी म्हणून, एक्साईज ड्यूटी क्विंटल मागे रु. ८·३५ पैसे इतकी कपात करण्यात आली असून, कारखान्यानी १९६७–६८ च्या हंगामात १९६६–६७ मधील उत्पादनाच्या ८० टक्क्यापेक्षा जास्त उत्पादन केल्यास अशा जास्त उत्पादनावर त्याना ५० टक्के एक्साईज ड्यूटीची माफी जाहीर करून उत्पादनवाढीस उत्तेजन देण्यात आले आहे. संपूर्ण विनियंत्रण धोक्याचे मानण्यात आले. खुल्या बाजारात विनानियंत्रण विकावयाच्या ४० टक्के साखरेच्या विक्रीवर कारखान्यांना भरपूर नफा सुटेल व त्यातून केन्द्र सरकारने ठरवून दिलेल्या उसाच्या किमान किमतीपेक्षा भरपूर जादा किंमत ऊसपुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना देऊन गुळाच्या वाढत्या भावामुळे होणाऱ्या तीव्र चढाओढीला सुलभतेने टक्कर देऊन, साखरकारखान्यांना जास्त ऊस मिळविणे शक्य होईल, अशी सरकारची अपेक्षा आहे.

या नवीन धोरणानुसार खुल्या बाजारात विकण्यासाठी खुला करण्यात आलेल्या साखरेचा पहिला हप्ता बहुतेक सर्व कारखान्यांनी विकला असून त्याला मिळालेला भरमसाठ भाव पाहता, सामान्य ग्राहकाला ही चढ्या भावाची साखर 'कडू' लागणे अपरिहार्य आहे. साखरेचे हे चढते भाव पाहून साखरधंद्यातील दीर्घ अनुभव असणारा माझ्यासारखा सामान्य गृहस्थ अस्वस्थ होणे साहजिकच आहे. सामान्य ग्राहकाला सरकारी धोरणानुसार नियंत्रित दरात साखर मिळणार आहे. तथापि ती फारच अपुरी आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकाविषयीची सरकारची केवळ सहानुभूती व्यक्त होत आहे. खुल्या बाजारात साखरेचे भडकलेले भाव पाहता या बाबतीत सरकारला सावधगिरीची सूचना देणे हे मी माझे कर्तव्य समजतो. मला ही परिस्थिती योग्य वाटत नाही हे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो. उसाला भरमसाठ दर दिला जात आहे. उत्पादनखर्चातही वाढ झालेली आहे व या सर्वांचा भुर्दंड सामान्य ग्राहकाला सोसावा लागत आहे. साखरउत्पादक व साखरेचे ग्राहक या दोघांच्याही दृष्टीने १९६७–६८ साल हे फार कठीण जाणार आहे.

कारखान्याकडून लेव्ही म्हणून सरकार घेणार असलेल्या साखरेचा महाराष्ट्र राज्यासाठी, २९–डी प्रतीचा दर क्विंटलला रु. १४५ असा ठरविण्यात आला आहे. उसाला यावी लागणारी भरम-

साठ किंमत व उत्पादनखर्चात झालेली एकूण वाढ लक्षात घेता, सरकारी लेव्हीसाठी द्याव्या लागणाऱ्या साखरेच्या प्रत्येक पोत्यामागे आपल्याला मोठाच तोटा सहन करावा लागणार आहे.

खुल्या बाजारात विकल्या जाणाऱ्या साखरेच्या किमतीतूनच हा तोटा आपणाला भरून काढावा लागणार आहे हे आपणास दिसून येईल. खुल्या बाजारात साखरविक्री करून मिळणारा फायदा हा सरकारला द्यावयाच्या ६० टक्के लेव्हीवर होणारा तोटा भरून काढण्यासाठीच बहुतांशी खर्ची पडणारा असल्यामुळे खुल्या बाजारात साखर विकून कारखान्यास अमाप नफा मिळेल अशी लोकांची जी कल्पना आहे ती कशी भ्रामक आहे ते दिसून येईल. शिवाय खुल्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या साखरेच्या पहिल्या हप्त्याला जो भाव मिळाला तो तसाच टिकून राहणार नाही व तो काही अंशी कमी अशा पातळीवर स्थिर होईल असे मला वाटते. त्याखेरीज, एकूण उत्पादनापैकी ५ टक्के साखर निर्यातीसाठी द्यावी लागणार असल्यामुळे त्यावर होणारा तोटा विचारात घेतला म्हणजे प्रत्यक्षात ४० टक्क्यांऐवजी फक्त ३५ टक्के साखरच खुल्या बाजारात विक्रीसाठी मिळू शकणार आहे. परिणामी, साखरेचे एकूण उत्पादन जास्त झाले तरच कारखान्याच्या पदरात प्रत्यक्ष असा फायदा पडू शकेल. अशा प्रकारे यंदाच्या हंगामात साखर धंद्याची आर्थिक स्थिती एकंदरीत कशी काय राहाते हे अद्याप अनिश्चित असून काही कालानंतरच तिचे स्वरूप स्पष्ट होऊ शकेल. आजचे विनियंत्रणाचे धोरण हे मुख्यत: तडजोडीच्या स्वरुपाचे आहे आणि त्यामुळे साखर कारखाने किंवा सामान्य ग्राहक यांचे समाधान होणार नसले तरी सद्य:परिस्थितीत हीच उपाययोजना योग्य आहे असे म्हणावे लागेल.

एकंदरीत सर्वसाधारणपणे बोलावयाचे म्हणजे सरकारच्या साखरेबाबतच्या या नवीन धोरणाच्या अंमलबजावणीत जर केन्द्र सरकार व राज्य सरकार यांचेकडून आणखी काही अडचणी व बंधने आली नाहीत व ते पूर्णपणे अमलात आले तर देशातील साखरेच्या उत्पादनात वाढ होईल आणि येत्या एकदोन वर्षात पूर्वीप्रमाणे उत्पादन होऊ शकेल असे म्हणावयास हरकत नाही.

उसासाठी द्याव्या लागणाऱ्या चढ्या भावाबद्दल बोलताना, महाराष्ट्र स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशनने या बाबतीत स्वीकारलेल्या अयोग्य धोरणाचा उल्लेख करणे जरूर आहे. ऊस पिकविण्यासाठी लागणारा खर्च आणि त्यावर मिळावयाचा आवश्यक नफा यांचा विचार करूनच आपल्या कारखान्याने द्यावयाचा फॅक्टरी पोहोच ऊसाचा किमान दर केन्द्र सरकारने निश्चित केला आहे. महाराष्ट्र स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशनकडे कंपनीच्या ज्या जमिनी देण्यात आल्या त्या जमिनीत पिकणारा ऊस केन्द्र सरकार ठरवील त्या दरातच कारखान्यास देण्याबद्दल कॉर्पोरेशनने मान्यता दिली असून, महाराष्ट्र लँड (सीलिंग ऑन होल्डिंग्ज ॲक्ट) या कायद्याचे कलम २८ मध्येही 'कंपनीच्या जमिनी कॉर्पोरेशन कडे दिल्यामुळे त्या जमिनीतून कारखान्यास होणाऱ्या ऊस पुरवठ्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही' असे आश्वासन देण्यात आले आहे. असे असताही, त्यांनी ठरविलेला, वाढविलेला भाव मिळाल्याखेरीज कारखान्यास ऊस देणार नाही व त्याची अन्यतऱ्हेने विल्हेवाट लाविली जाईल असे कॉर्पोरेशनने एकतर्फी जाहीर केले ही मोठी विचित्र गोष्ट म्हणावी लागेल. कार्पोरेशनचे हे धोरण कायद्यास सोडून असून दिलेल्या आश्वासनास बाध आणणारे आहे. खासगी क्षेत्रातील काही कारखान्यांनी कोर्टाकडे दाद मागितली आहे व सदर बाब कोर्टे प्रविष्ट आहे. स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशनने अवलंबिलेले हे धोरण माझ्या दृष्टीने व्यवहारनीती विरुद्ध व दिलेल्या आश्वासनास हरताळ फासणारे आहे.

स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशनने आमच्या जमिनीचा ताबा घेतल्यानंतर त्या जमिनीत होणाऱ्या ऊसाचे प्रमाण घटले आहे. त्या जमिनीतील उसावर कंपतीला जेथे फायदा होत होता तेथेच आता कॉर्पोरेशन नुकसान दाखवीत आहे.

साखरेच्या टंचाईच्या या काळात साखर निर्यात करू नये अशीच सर्वसाधारण लोकांची अपेक्षा आहे. परंतु माझा या बाबतचा दृष्टिकोन वेगळा आहे. साखरेच्या जागतिक आणि राष्ट्रकुलाच्या बाजारपेठेतील आपले स्थान कायम टिकविण्यासाठी दूरगामी धोरण ठेवून आपण किमान मर्यादेपर्यन्त तरी साखरेची निर्यात केली पाहिजे.

आपल्या डायरेक्टरांनी अहवालात नमूद केल्याप्रमाणे कंपनीच्या डिस्टिलरीचे कार्य अहवालाचे साली चांगले समाधानकारक झाल्याचे आपल्या निदर्शनास आले असेलच.

कंपनीच्या केमिकल डिव्हिजनचे कार्यही लौकरच फायदेशीर होऊ शकेल अशी मला अशा वाटते.

कंपनीच्या नोकरवर्गातर्फे चाललेल्या क्रीडाविषयक आणि सांस्कृतिक कार्याबद्दल मी या ठिकाणी दोन शब्द बोलू इच्छितो. या दोन्ही कार्यक्षेत्रांत केलेल्या कार्याचा अहवाल समाधानकारक आहे हे नमूद करण्यास मला आनंद वाटतो. या वर्षीही मैदानी व इतर खेळांत आपल्या खेळाडूंनी चांगलेच नैपुण्य दाखविले आहे. घाटगे आणि पाटील क्रिकेट ट्रॉफी आपल्या क्रिकेट संघाने यंदा जिंकली. जिल्हा टेबल टेनिस सामन्यात पुरुषांच्या एकेरी सामन्याचे अजिंक्यपद आपल्या खेळाडूने पटकाविले. त्याचप्रमाणे रत्नागिरी, वास्को व सावंतवाडी येथे झालेल्या बॅडमिंटन सामन्यातही आपल्या खेळाडूंनी चांगलेच यश संपादन केले.

सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या आपल्या 'जीवन कल्याण' संस्थेने नेहमीप्रमाणे शालेय व महाविद्यालयीन

शिक्षणासाठी सुमारे १२० विद्यार्थ्यांना अंदाजे रु. २,१००/–चे साहाय्य फी व पुस्तके वगैरेसाठी दिले. संस्थेचे ग्रंथालय व वाचनालय ही कामगार वर्गात फार प्रिय झाली असून त्यांचा फायदा खूपच कामगारबंधू घेत आहेत.

संस्थेतर्फे साजऱ्या झालेल्या श्रीगणेशोत्सवात यंदा सौभद्र, कीचकवध व स्वयंवर ही तीन नाटके अत्यन्त यशस्वीपणे सादर करण्यात आली व ज्या करवीरस्थ रसिकांनी ती पाहिली त्यांनी या तीनही नाट्यप्रयोगांची खूपच प्रशंसा केली.

कंपनीच्या गेल्या वर्षातील कामकाजाबद्दलचे माझे काही विचार मी आपणापुढे आतापर्यन्त थोडक्यात व्यक्त केले.

माझ्या सहकारी डारेक्टर्सनी अनेक कठीण प्रसंगी, कंपनीच्या हिताच्या दृष्टीने योग्य सल्ला देऊन आपल्या अनुभवाचा जो फायदा मला दिला त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणे आपण सर्वांनी आम्हांला प्रशंसनीय सहकार्य देऊन, संचालक मंडळावर आपण व्यक्त केलेल्या विश्वासास उचित अशा प्रकारे कंपनीचे कामकाज चालविण्यास जे सहाय्य केले त्याबद्दल आम्ही आपलेही आभारी आहोत.

कारखान्यास ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकरी बंधूंनी जे सहकार्य दिले त्याबद्दल, कंपनीचा अध्यक्ष या नात्याने मी त्यांचेही अभार मानतो.


कंपनीचे जनरल मॅनेजर, श्री. एम. बी. लोहिया, यांनी कंपनीच्या कार्यात जी थोर कर्तव्यनिष्ठा, दुर्मिळ व्यवहार-चातुर्य, अचुक निर्णयशक्ती व श्रेष्ठ दर्जाचे कार्यकौशल्य व्यक्त केले त्याबद्दल मला व संचालक मंडळातील माझ्या सहकाऱ्यांना अत्यन्त समाधान वाटले हे मी नमूद करू इच्छितो. श्री. लोहिया यांच्या अंगच्या या गुणापासून स्फूर्ती घेऊन, कंपनीचे अधिकारी व नोकरवर्ग यांनी जी कर्तव्यनिष्ठा व्यक्त केली त्याबद्दलही आम्ही समाधान व्यक्त करतो.

या नंतर कंपनीची सन १९६७–६८ सालची ताळेबंद व नफातोटा पत्रके मंजूर करण्यात यावीत असे मी सुचवितो.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

पुण्यांत याल तेव्हां —
उद्यान निवास

या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वंकष निवासामध्येच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर
टेलीफोन ५७७९१ माहिती मागवा उद्यान प्रासाद स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे २

महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग


तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड.
शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे. संपादक 'अर्थ'
किंमत ५० पैसे. २०–२–६७ रोजी प्रसिद्ध झाले.

## उत्तर प्रदेशातील साखरेचा धंदा धोक्यात

विदर्भ विभागातील उत्पादकता कौन्सिलतर्फे भरविण्यात आलेल्या परिसंवादात मध्यवर्ती सरकारचे राज्यमंत्री श्री. अण्णासाहेब शिंदे ह्यांचे भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की हिंदमध्ये निर्माण करण्यात येणाऱ्या साखरेपैकी ६० टक्के साखर अजूनही मुख्यतः उत्तर प्रदेश आणि बिहार ह्या राज्यांत तयार होते. तरीसुद्धा ह्या दोन राज्यांतील साखरेचे कारखाने संकटाने ग्रस्त झालेले आहेत. त्यांच्या अडचणी इतक्या थराला पोचल्या आहेत की साखरेचा धंदा केव्हा कोसळेल ह्याचा नेम राहिलेला नाही. उत्तर भारतामधील साखरेच्या कारखान्यांनी ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केलेला नाही, हे त्यांच्यासमोर उभ्या ठाकलेल्या बिकट अडचणींचे कारण आहे. ह्याच्याउलट महाराष्ट्र राज्यांत सहकारी साखर कारखान्याची स्थापना आणि वाढ झाली. त्यामुळे सहकारी साखर कारखान्यांच्या परिसरातील शेतकऱ्यांची आर्थिक भरभराट झाली. सामाजिक न्याय साधण्याच्या दृष्टीने ही गोष्ट महत्त्वाची आहे. कारण, शेतीवर आधारलेल्या कारखानदारीचा विकास झाला तरच हे शक्य होईल. ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक जीवनाचा विकास झाला की त्यांचा माल खरेदी करण्याची शक्ती वाढते आणि त्यामुळे उद्योगधंद्यांनाही अनकूल परिस्थिती लाभते. भरभराटलेली आणि आधुनिक पद्धतीची शेती दृढमूल झाल्याशिवाय देशात भांडवलाचा संचय होण्याची क्रिया चालू होणार नाही. त्यासाठी शेतीच्या मालावर संस्कार करणारे उद्योगधंदे ग्रामीण भागांतच स्थापन करण्यात आले पाहिजेत. त्यांची स्थापना झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था व उद्योगधंदे ह्यांची परिणामकारक जुळणी होऊ शकेल.

---

## सराईत गुन्हेगारांना सुधारण्याची योजना

सराईत गुन्हेगारांना सुधारण्यासाठी गुजरात सरकार एक नवी योजना अंमलात आणणार आहे. राजकोटजवळ गुन्हेगारांची एक वसाहत स्थापन करण्यात येणार आहे. ह्या वसाहतीत ५० सराईत गुन्हेगारांना त्यांच्या बायकामुलांसह ठेवण्यात येईल. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी काही तज्ज्ञांची नेमणूक करण्यात येईल. गुन्हेगारांना कामधंदा देण्यात येईल आणि उपयुक्त व्यवसायिक शिक्षणही देण्यात येईल. गुन्हेगारांची स्वतःच्या पायावर उभे राहण्याची तयारी होईपर्यंत त्यांच्या योगक्षेमाची सर्व व्यवस्था करण्यात येईल. त्यांचे शिक्षण पुरे झाल्यावर त्यांना बाहेर नोकऱ्या देण्याची खटपट केली जाईल परंतु ज्यांना बाहेर नोकऱ्या मिळणार नाहीत. त्यांच्यासाठी वसाहतीत रोजगार मिळवून देण्यात येईल. त्यासाठी मुद्दाम व्यवसाय केंद्रे स्थापन करण्यात येतील.

## रशियात सोन्याचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न

गेल्या काही वर्षांत रशियातील सायबेरिया भागाचे औद्योगीकरण झपाट्याने होऊ लागले आहे. ह्या भागात अनेक प्रकारची खनिजे सापडत आहेत. सायबेरियातील खनिज संपत्तीत हिरे, नैसर्गिक वायू, सोने इत्यादींचा समावेश आहे. रशियाने सोन्याच्या खाणीत अद्ययावत यंत्रसामग्री बसवून त्याचे उत्पादन वाढविण्याचे जोराचे प्रयत्न चालविले आहेत. रशियाला आंतरराष्ट्रीय व्यापार-व्यवहाराचे साधन म्हणूनच सोन्याचा मुख्यतः उपयोग होतो. अलीकडे अमेरिकेतील सोन्याचा साठा कमी होऊ लागला आहे, आणि त्याच वेळी रशिया मात्र त्याचे अधिक उत्पादन करू पाहात आहे. सोन्याच्या उत्पादनात दक्षिण आफ्रिकेनंतर रशियाचाच अनुक्रम लागतो. तथापि, रशियातील सोन्याच्या उत्पादनाचे आकडे जाहीर करण्यात येत नाहीत. लंडनच्या बाजारात रशिया सोन्याची विक्री मात्र नियमितपणे करीत असतो. ब्रिटनच्या पौंडाचे अवमूल्यन झाल्यापासून पश्चिम युरोपात सोन्याच्या खरेदीची लाट उसळली आहे. सोन्याच्या किंमती त्यामुळे वाढत असून त्याचा फायदा घेण्याचा रशियाचा इरादा असावा. जगाची चलन यंत्रणा नीट चालू ठेवण्यासाठी अमेरिकेला १ औंसाला ३५ डॉलर्स ह्या भावाने सोन्याची खरेदी करणे भाग आहे. नाहीतर सोन्याच्या किमती निम्म्यापर्यंत गडगडतील असे अमेरिकेचे म्हणणे आहे. पण अमेरिकेतील बँकवाले निराळ्या विचाराचे दिसतात. ते म्हणतात की सोन्याची किंमत १९३० पासून फारशी बदललेली नाही. इतर वस्तूंच्या किमती मात्र कितीतरी पटींनी वाढलेल्या आहेत. त्यांच्या मताने सोन्याची किंमत घसरण्याचे कारण नाही. किमतीत फरक पडला तर तो उलट दिशेने, म्हणजे वाढण्याच्या बाजूने पडेल असा त्यांचा कयास आहे.

---

## लोकसंख्येच्या वाढीची नमुनापाहणी

१९६६ साली भारताच्या लोकसंख्येच्या वाढीची नमुना पहाणी करण्यात आली असतांना असे आढळून आले की, १९६१ च्या शिरगणतीशी तुलना करता देशाच्या ग्रामीण भागातील लोकसंख्या ११·०७ टक्क्यांनी वाढली आहे आणि शहरी भागातील लोकसंख्या २०·१५ टक्क्यांनी वाढली आहे. १९६६ च्या मध्याला म्हणजे जून-जुलैच्या सुमारास भारताची एकूण लोकसंख्या सुमारे ४९·५ कोटी इतकी होती. त्यापैकी ४० कोटी लोक ग्रामीण भागात वसती करणारे होते. काही राज्यांची लोकसंख्या अशी होती :— आंध्रप्रदेश ३·९२ कोटी, आसाम १·४२ कोटी, बिहार ५·२३ कोटी, गुजरात २·३१ कोटी, मध्यप्रदेश ३·६१ कोटी, मद्रास ४·१५ कोटी, ओरिसा १·९४ कोटी, उत्तरप्रदेश ८·२ कोटी, महाराष्ट्र ४·२७ कोटी, पश्चिम बंगाल ४·०४ कोटी.

---

## रेडिओ आणि टेलिव्हिजनचा प्रसार

मनोरंजनाचे आणि ज्ञानप्रसाराचे अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणून आधुनिक जगात रेडिओला आणि टेलिव्हिजनला असाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. भारतासारख्या मागासलेल्या देशात ह्या साधनाचा प्रसार झपाट्याने होणे अगत्याचे आहे. दोहोंपैकी टेलिव्हिजनचे पडदे सामान्य जनापर्यंत पोचण्यास अद्याप अवकाश आहे. परंतु रेडिओचा प्रसार मात्र त्यामानाने अधिक गतीने होत आहे. अलीकडे ट्रान्झिस्टर रेडिओ निघाल्यापासून तर ही गती आणखीच वाढत आहे. तथापि, अशा प्रकारच्या चांगल्या रेडिओच्या किंमती अद्यापही सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर आहेत. भारताचे माहिती व ध्वनिक्षेपण खात्याचे मंत्री श्री. शहा ह्यांनी ह्या बाबतीत दिलेला दिलासा स्वागतार्ह आहे. त्यांचा असा अंदाज आहे की येत्या दोनतीन वर्षांत तीन ध्वनिलहरींवर चालणारा चांगला ट्रान्झिस्टर रेडिओ सुमारे १०० ते १२५ रुपयांपर्यंत मिळू शकेल. त्याचप्रमाणे मध्यम ध्वनिलहरीवर चालणारा रेडिओ ५० ते ७५ रुपयापर्यंत मिळू शकेल. अलीकडे रेडिओ तयार करणाऱ्या कारखान्यांत जोराची स्पर्धा सुरू झाली आहे. त्यामुळे रेडिओच्या किंमती कमी होत चालल्या आहेत. सध्या भारतात दरसाल सुमारे १४ लाख ट्रान्झिस्टर रेडिओ तयार होतात. येत्या दोनतीन वर्षांत त्यांचे उत्पादन दुपटीने वाढेल अशी शक्यता दिसत आहे. ट्रान्झिस्टर रेडिओ घेण्याची लोकांची प्रवृत्ती फोफावत आहे. किंमती उतरल्याने ती आणखीच जोरावेल ह्यात शंका नाही. तथापि, ट्रॅन्झिस्टर्स घेणारे लोक जरूर तो परवाना काढतातच असे नाही. परवाना काढण्याची पद्धत अतिशय सोपी करूनसुद्धा भारतात आज निदान १० लाख ट्रान्झिस्टर्स तरी विनापरवाना वापरण्यात येत आहेत.

---

## शेतीच्या पदवीधरांना उमेदवारीची जरुरी

बंगलोर येथील शेतीशास्त्राच्या विद्यापीठातर्फे निरनिराळ्या राज्यांच्या शेतकी खात्यात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा एक मेळावा भरविण्यात आला होता. मेळाव्याला गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, म्हैसूर, मद्रास आणि केरळ ह्या राज्यांतील शेतकी खात्यांचे वरिष्ठ अधिकारी आले होते. विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ. नाईक ह्या वेळी बोलताना म्हणाले की शेतीच्या आणि पशुवैद्यकीच्या पदवीधरांना ग्रामीण भागातील विस्तार योजनात काम करण्यास पाठविण्यापूर्वी काही काळ उमेदवारीच्या अभ्यासक्रमात व्यतीत करण्याची व्यवस्था झाली पाहिजे. इंजिनिअरिंगच्या आणि वैद्यकीय पदवीधरांना आपआपल्या व्यवसायाचे व्यावहारिक शिक्षण उमेदवारीच्या काळात घ्यावे लागते. मग, शेतीच्या व पशुवैद्यकीच्या पदवीधरांनीही तसेच शिक्षण का घेऊ नये !

---

**Provisions of the Desai Bank Award—as modified by the Bipartite Settlement 1966 (including those which continue to remain in force) (Rs. 3·00 each)**

**Available from the compiler**

**B. R. Kembhavi**
**940/4 Shivaji Nagar,**
**Poona 16.**



### गुडघ्यावरील आखूड झग्यांची निरनिराळी लांबी

पश्चिम युरोपातील देशांत तरुणींनी वापरावयाच्या झग्यांची लांबी अपाऱ्याने कमी झाली आहे. अलीकडे तर गुडघ्यावरील त्यांची लांबी खूपच घटली आहे. अशा झग्यांना मिनी स्कर्ट्स् म्हणतात आणि ते वापरणाऱ्या वयात आलेल्या तरुणी १५ ते २५ वर्षे वयाच्या गटांतील असतात. सार्वजनिक ठिकाणी आणि कचेऱ्यांतून अशा प्रकारचे आखूड झगे वापरण्यात येऊ नयेत म्हणून प्रयत्न करण्यात आले. पण, त्यांना विशेष यश आले नाही. गुडघ्यावर स्कर्ट किती उंच असावा ह्याचे नियम निरनिराळ्या देशात वेगवेगळे आहेत. पोलंडमध्ये स्कर्ट गुडघ्यावर जास्तीत जास्त ६ इंच चालतो. ऑस्ट्रिलिआत ७ इंचही चालतो. फ्रान्स, जर्मनी आणि डेन्मार्क देशांत ८ इंच चालतो. हॉलंडमध्ये जास्तीत जास्त ९ इंच आणि स्वीडन व ब्रिटनमध्ये १० इंच चालतो.

---

### आसाममधील वन्य प्राण्यांचे सुरक्षित निवासस्थान

आसाममधील 'काझीरंगा' नावाने प्रसिद्ध असलेला अरण्याचा विभाग वन्य प्राण्यांचे सुरक्षित निवासस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या विभागाची स्थापना ६० वर्षांपूर्वी करण्यात आली. आता त्याचा हीरक महोत्सव साजरा करण्यात येत आहे. ह्या संरक्षित वनात अनेक प्रकारचे वन्य प्राणी असून त्यांची हत्त्या करण्याची मनाई आहे. ह्या प्राण्यांत नाकावर एकच शिंग असलेला गेंडा असून तो फार दुर्मीळ आहे. गेंड्याच्या ह्या शिंगाला बाजारात १५,००० रुपयांपर्यंत किंमत येते. शिंग औषधी आहे असे म्हणतात. शिंगाच्या लोभाने गेंड्यांची चोरुनमारुन शिकार करण्यात येते. गेल्या वर्षी ३७ गेंडे चोरून मारण्यात आले. आता संशयित शिकाऱ्यांच्या बंदुका काढून घेण्यात येत आहेत. सध्या अशा गेंड्यांची संख्या ३७० आहे.

---

### भारताची चहाची निर्यात सुधारली

चहाच्या निर्यातीत भारताने आपले अग्रेसर स्थान दोन वर्षांपूर्वी गमावले होते. पण, आता ते परत मिळविण्यात आले आहे. ह्या वर्षी भारताने २०.५ कोटी किलोग्रॅम चहा निर्यात करून उच्चांक गाठला आहे. अखेरचे आकडे हाती आल्यावर निर्यात ह्याहीपेक्षा अधिक झाली असल्याचे आढळून येण्याची शक्यता आहे. १९६५ साली जगातील चहा निर्यात करणाऱ्या देशात सीलोनने पहिले स्थान पटकविले होते. त्या वर्षी भारताची चहाची निर्यात गडगडून १७.९ कोटी किलोग्रॅम झाली होती. १९६६ साली निर्यातीच्या बाबतीत थोडी सुधारणा झाली. त्या वर्षी १९.९ कोटी किलोग्रॅम चहा निर्यात करण्यात आला. चहाच्या निर्यातीत परस्परांशी स्पर्धा करून किमती खाली आणण्यापेक्षा त्या स्थिर राखण्याचे प्रयत्न भारत व सीलोन करणार आहेत.







**छोट्या मोटारींची निर्मिती**—मध्यमवर्गाला परवडेल अशा प्रकारच्या छोट्या मोटारींची निर्मिती करण्याचा प्रश्न आज कित्येक वर्षे चर्चिला जात आहे. निरनिराळी राज्ये छोट्या मोटारींचा कारखाना काढण्याचा परवाना मिळविण्याची खटपट करीत आहेत. गुजरातमधील दोन खाजगी कारखानदारांनी ह्यासंबंधी आपल्या योजना मध्यवर्ती सरकारला सादर केल्या आहेत. राज्य सरकारने त्यांच्या योजनांची शिफारस केली आहे.

**साखरेच्या पुरवठ्यात कपात**—उत्तर प्रदेशातील शहरांतून १ डिसेंबर पासून साखरेच्या वाटपात कपात करण्यात आली आहे. दर युनिटला दरमहा १ किलोग्रॅम साखर देण्यात येत होती; ती आता ७०० ग्रॅमच देण्यात येते. राज्याला दरमहा १६ हजार टन साखर मध्यवर्ती सरकारकडून मिळत असे. त्यात कपात करून आता दरमहा १०,६३० टनच साखर देण्यात येत आहे.

**पौंडाच्या अवमूल्यनाचा परिणाम**—पौंडाचे अवमूल्यन झाल्यापासून केरळमधील मिऱ्याच्या निर्यातीवर परिणाम झाला आहे. परदेशातील ग्राहकांना मिरे आता १४·२ टक्के अधिक किंमत देऊन विकत घ्यावे लागत आहेत. त्यामुळे इंडोनेशियातून निर्यात होणाऱ्या मिऱ्याशी भारताला स्पर्धा करता येत नाही, म्हणून मिऱ्यावरील निर्यात जकात कमी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

**म्हैसूरच्या बंदरांचा विकास**— म्हैसूर राज्याच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांचा विकास करण्याच्या कामी पोलंडने आस्था दाखविली आहे. म्हैसूर राज्यात कारवार, होनावर, मालपे, मंगलूर, इत्यादी बंदरे असून त्यांचा विकास करण्यात आल्यावर मासे आणि इतर निर्यात माल ह्यांचा व्यापार वाढण्यास मदत होईल. विकासाची योजना आखण्याचे काम पोलंडची सरकारी कंपनी करणार आहे.

**स्त्रिया अधिक रजा घेतात:** केरळ वीज बोर्डाची बिले करण्याचे काम फार तुंबून राहिले आहे. त्यासंबंधी चौकशी करण्याकरता एक एकसदस्य मंडळ नेमण्यात आले होते. मंडळाने आपल्या अहवालात असे नमूद केले आहे की पुरुष नोकरवर्गापेक्षा स्त्रीनोकरवर्ग अधिक रजा घेतो. त्यामुळे काम तुंबून राहते.

**बुद्धाच्या जन्मस्थानाचा विकास**—भगवान गौतम बुद्धाचे जन्मस्थान म्हणून नेपाळमधील लुंबिनी हे ठिकाण प्रसिद्ध आहे. बुद्धधर्मीयांना बोधगया ह्या क्षेत्राप्रमाणेच लुंबिनी हे स्थानही पवित्र वाटते. ह्या ठिकाणाला भेट देण्यासाठी अनेक देशांतील प्रवासी येतात. परंतु तेथे त्यांना जरूर त्या सोयी उपलब्ध नाहीत. प्रवाशांना आकर्षित करणारे एक स्थळ म्हणून लुंबिनी गावाचा विकास करण्याचे ठरले आहे. ह्या कामी संयुक्त राष्ट्र संघटना हातभार लावणार आहे.

**भारतामधील रुग्णांची संख्या**—ऑल इंडिया मेडिकल कॉन्फरन्सचे अध्यक्ष श्री. प्राणलाल त्रिवेदी ह्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे भारतात ६५ लाख लोक नेहमीच आजारी असतात. एकूण लोकसंख्येपैकी सुमारे १३·३ टक्के लोक कोणत्या तरी आजाराने व्यथित झालेले असतात. त्यापैकी ४·३ टक्के लोक दुर्धर रोगाने, ७·३ टक्के लोक कायम स्वरूपाच्या व्याधीने आणि १·७ टक्के लोक किरकोळ दुखणी भोगत असतात.

**युद्धामुळे पंजाबचे नुकसान**—१९६५ साली भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत झालेल्या युद्धामुळे अमृतसर जिल्ह्यात ३०५ लाख रुपयांचे नुकसान झाले अशी माहिती पंजाब विधान सभेत सांगण्यात आली. ह्या नुकसानीत उभ्या पिकांच्या नासाडीमुळे झालेल्या नुकसानीचाही समावेश आहे.

**अफगाणिस्थानात बुद्धकालीन अवशेष**—अफगाणिस्थानातील कलावस्तूंचे एक प्रदर्शन अलीकडे ब्रिटनमध्ये भरविण्यात आले होते. प्रदर्शनातील बहुतेक वस्तू बुद्धकालीन कलेचे नमुने होते. त्यात अनेक प्रकारची मातीची भांडी, छोट्या पुतळ्या, नाणी, इत्यादी वस्तूंचा भरणा होता. अफगाणिस्थानावर मुसलमानी राज्यकर्त्यांचा अंमल १० व्या शतकात बसला. त्यानंतर बुद्धकालीन कलेचा ऱ्हास झाला.

**न्यायाधीशांची परिस्थिती सुधारा**—भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. के. सुब्बा राव ह्यांनी न्यायाधीशांची परिस्थिती सुधारण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या मताने सरन्यायाधीशांला दरमहा ६,००० रुपये पगार देण्यात यावा आणि इतर न्यायाधीशांना दरमहा ५,५०० रुपये पगार देण्यात यावा. नव्याने नेमण्यात येणाऱ्या न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय ७० ठेवण्यात यावे. शिवाय त्यांना राहण्यास मोफत बंगला व इतर सवलती द्याव्या.

**सागरी इंजिनांची निर्यात**—हिंदमधील एका प्रसिद्ध खाजगी मालकीच्या कारखान्याला ७० लाख रुपये किमतीची बोटीची सागरी इंजिने पुरविण्यासंबंधी विचारणा करण्यात आली आहे. संयुक्त अरब प्रजासत्ताकाकडून एंजिनांची ही मागणी करण्यात आली आहे. अशाच प्रकारची इंजिने युगोस्लाव्हिआला पुरविण्यासाठीही सध्या वाटाघाटी चालू आहेत. अरब प्रजासत्ताकाने भारताकडे जीपगाड्या व कापडगिरण्यांची यंत्रसामग्री ह्यासंबंधीही विचारणा केली आहे.

**महाराष्ट्रातील बोलपटाचा धंदा**— महाराष्ट्र राज्य हे बोलपटाच्या धंद्यात अग्रेसर होते. परंतु अलीकडे मुंबईमधील सिने-स्टुडिओ बंद होऊ लागले आहेत. मद्रास राज्य आता ह्या धंद्यात पुढे येऊ लागले आहे. तीस वर्षांपूर्वी तेथे अवघे ५ स्टुडिओ होते आता त्याची संख्या २० पर्यंत वाढली आहे. मुंबईमधील सिनेमातील व्यवसायिकांनी आपल्या अडचणी राज्यसरकारला कळविल्या आहेत.

## कोयनेच्या भूकंपाचा दगडाच्या खाणींवर परिणाम

कोयनेच्या परिसरातील पडझडीची पाहणी करीत असता असें दिसून आल्याचे कळते कीं, ज्या इमारती किंवा भिंती विटांनी बांधलेल्या होत्या त्यांना दगडी भिंतींच्या मानाने धक्का कमी जाणवला आहे. विशेषतः रुंद दोन विटांच्या किंवा जास्त रुंदीच्या भिंतीत हा फरक अधिकच दिसतो. चुन्याने बांधलेल्या विटांच्या भिंती शाबूत तर चुन्यानेंच बांधलेल्या दगडी भिंती कोसळलेल्या आहेत असे सांगण्यात येते. ह्याचा परिणाम म्हणजे कोयना-कराड भागातील विटांच्या भट्टयांना जास्त काम मिळत असून दगडाच्या खाणींचा धंदा सध्या बसल्यासारखाच आहे. काँक्रीटच्या भिंती व घरेदेखील धरणीकंपाने मोडकळीस आल्यामुळे त्यासाठी लागणाऱ्या खडीची मागणीही कमी होऊन पर्यायाने खाणीचे काम आणखीच कमी होण्याची शक्यता दिसते. खाणीत रोजावर काम करणाऱ्या शेकडो मजुरांना ह्याची झळ लागण्याची भीती आहे. विटांच्या भिंती दगडी भिंतीपेक्षा खरोखरीच भूकंपप्रतिकारक आहेत की नाहीत, हे तज्ज्ञांकडून तपासून घेणे आवश्यक आहे. नाहीतर खाणींचा धंदा निष्कारण बंद पडण्याची वेळ येईल.

## महाराष्ट्र बँकेच्या संचालक मंडळाची पुनर्रचना

बँकांवरील सामाजिक नियंत्रणाच्या तरतुदीनुसार श्री. पी. एन. वर्दे ( ल्यूनॉर कॉस्टिक इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक ) आणि कॅप्टन हंबीरराव अमृतराव मोहिते ( प्रवरा सहकारी साखरकारखान्याचे संचालक ) ह्यांची बँकेचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. चिं. वि. जोग ( जनरल मॅनेजर ) हे त्यापूर्वीच चेअरमन झाले आहेत.

## भूकंपाचे ३५० कोटी रु. चे विमे


११ डिसेंबरच्या भूकंपापासून आतापर्यंत मुंबई-पुणे विभागात विमा कंपन्यांनी ३५० कोटी रुपयांचे भूकंपाचे विमे दिले आहेत. प्रत्येक १,००० रुपयांच्या जोखमीस २० पैसे, असा हप्ता आहे.

## १०० रु. च्या चलनी नोटेवर नव्या गव्हर्नरांची सही

रिझर्व्ह बँकेच्या १०० रु. च्या नव्या चलनी नोटांवर बँकेचे विद्यमान गव्हर्नर, श्री. एल. के. झा ह्यांची सही असेल. ह्या नव्या सही खेरीज बाकी कोणताही बदल होणार नाही; जुन्या नोटा चालू राहातीलच.


पत्त्याचा खेळ जेंव्हा निघाला तेंव्हा त्या खेळांत काल-मान दर्शनाचीही कल्पना अंतर्भूत होती. त्याचे चार रंग, चार ऋतु (भारताबाहेर बऱ्याच ठिकाणी चार ऋतु मानतात) किंवा चार तिमाह्या दर्शविणारे होते. १३ पानांचा एक रंग अशारितीने प्रत्येक तिमाहीचे १३ आठवडे कल्पिले होते, व एकूण ५२ पत्ते ५२ आठवड्याचे निदर्शक होते. एक्का ते दश्शापर्यंत प्रत्येक पत्त्यावरील ठिपक्याप्रमाणे त्याचे गुणांची बेरीज करून गुलाम ११, राणी १२, व राजा १३ अशी त्यांत बेरीज धरल्यास ५२ आठवड्याचे ३६४ दिवसांचा उलगडा होतो. जोकर (विदूषक) चा पत्ता धरून सर्व बेरीज संपूर्ण वर्षाच्या ३६५ दिवसा इतकी होते. हा खेळ खेळतांना ही काल-गणना कायम डोळ्यासमोर रहावी हा त्यांत उद्देश होता.

दि बँक ऑफ महाराष्ट्रशी जेंव्हा तुमचा संबंध येतो तेंव्हा तो वर्षभरासाठीं, चारी तिमाहीसाठीं, ५२ आठवड्या-साठीं आणि ३६५ दिवसांसाठीं यावा असाच आपला उद्देश असावा असे आम्हाला नम्रपणें वाटतें. महाराष्ट्र बँकेत योग्य ते खाते उघडून तुम्ही वर्षभर पैसे वाचवूं शकतां व त्यावर व्याज मिळवूं शकतां. तसेच आमच्या वस्तु-रक्षा-गृहात तुम्ही मौल्यवान वस्तु ठेवूं शकतां, विदेशीय व्यवहारासाठीं विदेशविनिमय खात्याचा फायदा घेऊं शकतां, किंवा तुमच्या व्यवसायवृद्धीसाठीं अर्थ-सहाय्य घेऊं शकतां. लहान उद्योगधंदे उर्जितावस्थेला आणणे हे तर स्थापनेपासून गेली ३२ वर्षे महाराष्ट्र बँकेचे ध्येय आहे.




तुमच्या कुठल्याही बँकींग व्यवहारासाठीं आमच्या नजिकच्या शाखेला भेट द्या. तेथे तुमचे सस्मित स्वागत होईल.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.